**MHNS240024302024**

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | ०९/१२/२०२४ |
| नोंदणी तारीख | : | ११/१२/२०२४ |
| निकाल तारीख | : | ०४/०५/२०२६ |
| कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०१ ०४ २५ |
| निशाणी क्रमांक | | **५६/ब** |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सटाणा, जि.नाशिक यांच्या न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी सी.यु. शिपकुले)

**नियमीत फौजदारी खटला क्र.३५८/२०२४**

प्रथम खबर क्र.५०७/२०२४, पोलीस ठाणे सटाणा.

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष/फिर्यादी | महाराष्ट्र सरकार तर्फे पोलिस ठाणे सटाणा<br>ता. बागलाण, जि.नाशिक. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | श्री. एस.आर. गायकवाड. |
| आरोपी | **०१. सृष्टी अतुल कापुरे,** वय – २० वर्ष,<br>**०२. शुभम राजेंद्र मोरे,** वय – २२ वर्ष,<br>**०३. रेखा राजेंद्र मोरे,** वय – ४१ वर्ष,<br>**०४. सुदाम रमेश मोरे,** वय – ३३ वर्ष,<br>**०५. मनिषा सुदाम मोरे,** वय – २८ वर्ष,<br>**०६. सोमनाथ रमेश मोरे,** वय – ३२ वर्ष,<br>**०७. शोभा पंढरीनाथ आहिरे,**वय –५८ वर्ष,<br>सर्व रा. उमराणे, ता. देवळा, नाशिक. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. एम. आर. हिरे |
| घटना तारीख | ०८/०७/२०२४ |
| प्रथम खबर तारीख | १२/०७/२०२४ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०९/१२/२०२४ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चित तारीख | २१/०७/२०२५ |
| पुरावा चालु तारीख | ०७/०१/२०२६ |
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | नाही |
| न्यायनिवाडा तारीख | ०४/०५/२०२६ |

## आरोपींची सविस्तर माहिती

| आरोपीचा क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर मुक्त केल्याची तारीख | दोषारोप निश्चित केलेले कलम | निर्दोष मुक्ता केले का दोषारोप सिध्द झाले | शिक्षा | शिक्षेची वजावट झालेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | सृष्टी अतुल कापुरे | अटक नाही | ०८/०७/२०२५ | भारतीय न्याय संहिता कलम ११८(१), १८९(२), १९०, १९१(१)(२), ३२४(१), ३५१(२), ३५२ अन्वये | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०२ | शुभम राजेंद्र मोरे | अटक नाही | २१/०६/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०३ | रेखा राजेंद्र मोरे | अटक नाही | २१/०६/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०४ | सुदाम रमेश मोरे | अटक नाही | २१/०६/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०५ | मनिषा सुदाम मोरे | अटक नाही | २१/०६/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०६ | सोमनाथ रमेश मोरे | अटक नाही | २१/०६/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |
| ०७ | शोभा पंढरीनाथ आहिरे | अटक नाही | २१/०६/२०२५ | वरीलप्रमाणे | निर्दोष मुक्तता | नाही | नाही |

**अ– अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| सा क्र. ०१ | निशा पुरुषोत्तम कापुरे | फिर्यादी |
| सा.क्र.०२ | बाबुलाल रामसिंग कापुरे | साक्षीदार |

**अ– आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अ– न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र–**

**अ. अभियोगपक्षातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३९ | फिर्याद –सा.क्र.०१ |

**आरोपीतर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ४२ | घटनास्थळ पंचनामा |
| २ | ४३ | मुद्देमाल पावती |
| ३ | ४४ | वैद्यकिय प्रमाणपत्र |

**न्यायालयातर्फे –**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**मुद्येमाल –**

| अ.क्र. | आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

## न्यायनिर्णय

(दिनांक ०४/०५/२०२६ रोजी घोषीत)

उपरोक्त आरोपींचे विरुध्द भारतीय न्याय संहितेचे (संक्षिप्तपणे 'भा.न्या.सं') कलम ११८(१), १८९(२), १९०, १९१(१)(२), ३२४(१), ३५१(२), ३५२ अन्वये शिक्षेस पात्र अपराध केल्याच्या आरोपावरुन संपरिक्षा चालविण्यात आली.

**<u>अभियोगपक्षाची हकीकत थोडक्यात खालीलप्रमाणे</u> –**

**०२.** फिर्यादी निषा पुरुषोत्तम कापुरे हि दि.०८/०७/२०२४ रोजी १२.३० वाजेच्या सुमारास मळयात घरी असतांना आरोपी क्र.०१ ते ०७ हे मोटारसायकलने तेथे गेले व तिच्या सासु सास–यांना तुमचा मुलगा अतुल हा आमच्याकडे लग्नाच्या कार्यक्रमाकरिता आला होता, तो मुक्कामी राहिला नाही या कारणावरुन मोठ–मोठ्याने आरडा ओरड करुन तिच्या सासु सास–यांना दमबाजी करुन शिवीगाळ केली. फिर्यादी वाद मिटवण्यासाठी गेली असता आरोपींनी तिला 'तु शहाणी आली' असे म्हणुन हाताचापटीने मारहाण करुन केस ओढुन जमीनीवर आदळले. सदर झटापटीत तिच्या गळयातील मंगळसुत्र पोत तुटुन गहाळ झाली. त्यावेळी आरोपी क्र.०२ याने काठी उचलुन तिचे सासरे बाबुलाल यांना मारली. तसेच इतर लोकांनी फिर्यादीस तसेच तिच्या सासु सास–यांना धक्काबुक्की करुन 'तुमचा एखाद्या दिवशी रात्री पहाटे येवुन बेत पाहतो, तुमच्या मुलांना बोलवा त्याचेपण हातपाय तोडतो' अशी दमदाटी केली. त्यानंतर त्यांच्या सास–यांनी गावातील लोकांना फोन केल्यानंतर आरोपी तेथुन निघुन गेले. फिर्यादीस सदर मारहाणीत मुक्का मार लागला होता. त्यानंतर ते सटाणा पोलीस स्टेशनला गेले व तेथुन सटाणा सरकारी दवाखान्यात उपचाराकरिता दाखल झाले. तद्नंतर फिर्यादीने सटाणा पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादवरुन सटाणा पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र.५०७/२०२४ अशी नोंद घेण्यात आली. सदर गुन्हयाचा तपास तपासी अधिकारी पो.हा./२७२६ श्री. आर.बी. ठोके यांनी करुन आरोपींविरुद्ध दोषारोप पत्र दाखल केले.

**०३.** मी, आरोपींविरुध्द नि.क्र.२५ वर भा.न्या.सं. २०२३ कलम ११८(१), १८९(२), १९०, १९१(१)(२), ३२४(१), ३५१(२), ३५२ अन्वये दोषारोप नोंदविला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे नि.क्र.२६ ते ३२ कडे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली. आरोपींविरुध्द पुरावा न आल्यामुळे त्यांचे भा.ना.सु.सं. चे कलम ३५१ अन्वये निवेदन नोंदविले नाही. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींतर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात व त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | आरोपींनी दि.०८/०७/२०२४ रोजी १२.३० वाजताच्या सुमारास मौजे उमराणे, ता. देवळा, जि. नाशिक येथे फिर्यादीच्या घरी समान उद्देशाने बेकायदेशिर रित्या जमाव केला आणि त्याद्वारे भा.न्या.सं. कलम १८९(२) सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय? | **नाही.** |
| ०२. | आरोपींनी वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी समान उद्देशाने बेकायद्याचा जमाव करुन दंगल घडवुन आणली आणि त्याद्वारे भा.न्या.सं. कलम १९१(१) सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय? | **नाही.** |
| ०३. | आरोपींनी संगनमत करुन वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी समान उद्देशाने बेकायद्याचा जमाव करुन घातक शस्त्राच्या सहय्याने दंगल घडवुन आणली आणि त्याद्वारे भा.न्या.सं. कलम १९१(२) सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय? | **नाही.** |
| ०४. | आरोपींनी वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी समान उद्देशाने बेकायद्याचा जमाव करुन घातक शस्त्राच्या सहय्याने दंगल घडवुन आणुन तुमच्यापैकी आरोपी क्र.०२ याने साक्षीदार बाबुलाल यांना काठीने मारहाण करुन गंभिर दुखापत केली आणि त्याद्वारे भा.न्या.सं. कलम ११८(१) सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय? | **नाही.** |
| ०५. | आरोपींनी वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, समान उद्देशाने बेकायद्याचा जमाव करुन घातक शस्त्राच्या सहय्याने दंगल घडवुन आणुन फिर्यादीचे मंगळसुत्र तोडुन त्यांचे रु.५० पेक्षा जास्त किंमतीचे नुकसान केले आणि त्याद्वारे भा.न्या.सं. कलम ३२४(१) सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय? | **नाही.** |

| | | |
|---|---|---|
| ०६. | आरोपींनी वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, समान उद्देशाने बेकायद्याचा जमाव करुन फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करून सार्वजनिक शांततेचा भंग करावा किंवा अन्य कोणताही अपराध करावा या उद्देशाने त्यांचा अपमान केला आणि त्याद्वारे भा.न्या.सं. कलम ३५२ सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय ? | **नाही.** |
| ०७. | आरोपींनी वरील नमुद तारखेस, वेळी व ठिकाणी, समान उद्देशाने बेकायद्याचा जमाव करुन फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा केला आणि त्याद्वारे भारतीय न्याय संहिता कलम ३५१(२) सह कलम १९० अन्वये अपराध केला असे अभियोगपक्षाने सिद्ध केले काय ? | **नाही** |
| ०८. | आदेश काय ? | **आरोपींना निर्दोष मुक्त केले.** |

**:: कारणमिमांसा ::**

**०४.** अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप शाबीत करण्यासाठी फिर्यादी यांचा नि.क्र. ३७ कडे व जखमी बाबुलाल रामसिंग कापुरे यांचा नि.क्र.४० कडे पुरावा नोंदविला आहे. अभियोगपक्षाने फिर्याद नि.क्र.३९ पुराव्याकामी सादर केली आहे. आरोपीने घटनास्थळ पंचनामा, मुद्देमाल पावती, वैद्यकिय प्रमाणपत्र अनुक्रमे नि.क्र.४२ ते ४४ कडे मान्य केली आहे. अभियोगपक्षाने पुरसीस नि.क्र.४५ नुसार पुरावा बंद केला आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ०१ ते ०७ करीता</u>–**

**०५.** भा.न्या.सं. कलम ११८(१), १८९(२), १९०, १९१(१)(२), ३२४(१), ३५१(२), ३५२ नुसार दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्षाने हे सिद्ध करणे आवश्यक आहे की, आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला व साक्षीदारास काठी सारख्या घातक शस्त्राने मारहाण करुन दुखापत पोहोचविली, तसेच शिवीगाळ व

फौजदारीपात्र धाकदपटशा केला. फौजदारी न्यायशास्त्राप्रमाणे आरोपीवरील अपराध शंकेपलीकडे जावून शाबीत करण्याची सर्वस्वी जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. पुराव्यामध्ये एखादी शंका अथवा संशय निर्माण झाल्यास सदर संशयाचा फायदा फौजदारी न्यायशास्त्रानुसार आरोपीस दिला जातो.

०६. भारतीय पुरावा अधिनियमानुसार आरोपीवरील अपराध शाबीत करण्याकरीता अभियोगपक्षाला साक्षीदारांच्या संख्येची आवश्यकता नाही. अभियोगपक्ष केवळ एका साक्षीदाराच्या पुराव्यावरुन आरोपीवरील दोषारोप शाबीत करु शकतो. अभियोगपक्षास त्यानुसार दोषारोप शाबीत करण्याकरीता सादर केलेला साक्षीदाराचा पुरावा सक्षम व विश्वासार्थ असायला पाहिजे जेणे करुन त्यावर विसंबून राहून दोषारोप शाबीत होत आहे याव्यतिरीक्त दुसरा निष्कर्ष काढता येणार नाही.

०७. फिर्यादी निशा पुरुषोत्तम कापुरे (सा.क्र.०१) यांनी सरतपासात कथन केले की, आरोपी त्यांचे नातेवाईक असल्याने त्या त्यांना ओळखतात. आरोपी व त्यांच्यामध्ये दि.१२/०७/२०२४ रोजी किरकोळ वाद झाल्याने त्यांनी गैरसमजुतीने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली. फिर्यादीने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे त्यांना सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामधुन अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब पटलावर आली नाही. तसेच जखमी साक्षीदार बाबुलाल रामसिंग कापुरे (सा.क्र.०२) यांनी देखिल त्यांच्या सरतपासात आरोपी त्यांचे नातेवाईक असल्याने ते त्यांना ओळखतात. आरोपी व त्यांच्यामध्ये दि.१२/०७/२०२४ रोजी किरकोळ वादा व्यतिरिक्त काहीही घडले नव्हते. पोलीसांनी त्यांचे तपासटिपण नोंदविले नाही असे कथन केले आहे. साक्षीदाराने अभियोगपक्षास सहाय्य केले नसल्यामुळे त्यांना सुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतु त्यामधुन अभियोगपक्षास उपयुक्त अशी कोणतीही बाब पटलावर आली नाही.

०८. एकंदरीतच अभिलेखावरील पुरावा पाहता आरोपीतर्फे जरी घटनास्थळ पंचनामा, वैद्यकिय प्रमाणपत्र मुद्देमाल पावती इत्यादी कागदपत्र मान्य केली असली तरी फिर्यादी व जखमी साक्षीदारांनी आरोपींनी त्यांना मारहाण केल्याबाबत कोणतेही कथन केलेले नाही. त्यामुळे वैद्यकिय प्रमाणपत्रामधील जखमास आरोपींना जबाबदार धरता येणार

नाही. फौजदारी न्यायशस्त्रानुसार आरोपींविरुद्ध अपराध शंकेच्या पलिकडे जावून शाबीत करणेची सर्व जबाबदारी अभियोगपक्षावर आहे. सदर गुन्हयामध्ये आरोपींच्या विरुध्द कोणताही पुरावा न आल्याने तसेच साक्षीदारांच्या तडजोडीमुळे अभियोगपक्ष आरोपींवरील तोहमत दोषारोप शंकेच्या पलीकडे जावून शाबीत करु शकला नसल्याने मी, **मुद्दा क्रमांक ०१ ते ०७ चे निष्कर्ष नकारार्थी** देत आहे.

**मुद्दा क्रमांक ०८ करीता–**

**०९.** मी, मुद्दा क्रमांक ०१ ते ०७ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले असल्याने, आरोपीला या खटल्यातुन पुराव्या अभावी निर्दोष मुक्त करणे न्यायोचित राहिल असे मला वाटते म्हणून मी मुद्दा क्र.०८ तथा खटला न्यायनिर्णय कामी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आ दे श

**०१.** आरोपींना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१ (१) नुसार भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ११८(१), १८९(२), १९०, १९१(१)(२), ३२४(१), ३५१(२), ३५२ खालील गुन्हयांमधून निर्दोष मुक्त करण्यात येते.

**०२.** आरोपीचा जामीनकब्जा रद्द करुन त्यांना खुले करण्यात येते.

**०३.** प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्येमाल म्हणजेच एक काठी मुल्यहीन असल्याने अवाहन कालावधीनंतर तिचा नाश करण्यात यावा.

**०४.** आरोपींनी भा.ना.सु.सं. २०२३ चे कलम ४८१ च्या पुर्ततेकामी रक्कम रुपये १५,०००/– चा जामिनकब्जा दिलेला आहे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

SHIPKULE CHARUDATTA
Digitally signed by SHIPKULE CHARUDATTA
Date: 2026.05.04 15:56:02 +0530

**स्थळ : सटाणा.** **(चारुदत्त उध्दव शिपकुले)**
**दिनांक : ०४/०५/२०२६.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सटाणा.**